महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक:डीआरए-०५२२/प्र.क्र.***/२०२*/जाहिरात दिनांक: १८ जानेवारी, २०२४

**-: शुध्दीपत्रक :-**

**विषय : प्राचार्य, शासकीय हॉटेल मॅनेजमेंट व कॅटरिंग टेक्नॉलॉजी, महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा, गट-अ**

**संदर्भ : जाहिरात क्रमांक- ०६९/२०२३**

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागातील तंत्रशिक्षण संचालनालयातर्गत **प्राचार्य, शासकीय हॉटेल मॅनेजमेंट व कॅटरिंग टेक्नॉलॉजी, महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा, गट-अ** या संवर्गातील एकूण ०२ पदांच्या भरतीकरीता दिनांक १३ सप्टेबर, २०२३ रोजी जाहिरात (जाहिरात क्रमांक ०६९/२०२३) प्रसिध्द करण्यात आली होती. प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज करण्याचा अंतिम दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२३ असा होता. तथापि, शासन पत्र, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक: संकिर्ण-११११/(११३/२३)/तांशि-२, दिनांक ०३ जानेवारी, २०२४ अन्वये शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ मधील अनुक्रमांक ३६ मध्ये नमूद तरतुदीनुसार खालील अर्हता Hotel Manage,ment And Catering Technology याकरीता समकक्ष अर्हता ग्राह्य समजण्याबाबत कळविले आहे:-

| **समतुल्य अर्हता** | |
|---|---|
| **पदवी** | **पदव्युत्तर पदवी** |
| Hospitality Management | Hospitality Management |
| | Tourism Management |
| | P.G. Diploma (2 Years Duration) in above field |

२. उपरोक्त समतुल्य अर्हता ग्राह्य समजण्यात आल्यामुळे, सदर अर्हताप्राप्त उमेदवारांना अर्ज सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात येत असून जाहिरात क्रमांक ०६९/२०२३ या जाहिरातींस अनुसरुन अर्ज सादर करण्याच्या प्रक्रियेस खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे:-

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | **अर्ज सादर करावयाचा कालावधी** | **दिनांक १९ जानेवारी, २०२४ रोजी १४.०० ते दिनांक २६ जानेवारी, २०२४ रोजी २३.५९** |
| २ | **ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क भरण्याकरीता विहित अंतिम दिनांक** | **दिनांक २६ जानेवारी, २०२४ रोजी २३.५९** |
| ३ | **भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेणे याकरीता विहित अंतिम दिनांक** | **दिनांक २८ जानेवारी, २०२४ रोजी २३.५९** |
| ४ | **चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक** | **दिनांक २९ जानेवारी, २०२४ रोजी २३.५९** |

३. जाहिरात क्रमांक ०६९/२०२३ नुसार विहित पध्दतीने अर्ज केलेल्या उमेदवारांनी पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही.
४. वयोमर्यादा गणण्याचा दिनांक तसेच शैक्षणिक अर्हता आणि अनुभव गणण्याचा कालावधी हा मूळ जाहिरातीमध्ये नमूद दिनांकानुसारच गणण्यात येईल.
५. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सनिव २०२३/प्र.क्र.१४/कार्या-१२, दिनांक ०३ मार्च, २०२३ अनुसार कमाल मयोमर्यादेत दोन वर्षे इतकी शिथिलता देण्यात येत आहे.
६. जाहिरातींमधील इतर अटी व तरतुदींमध्ये कोणताही बदल नाही.
७. सदर शुध्दीपत्रक तसेच मूळ जाहिरात क्रमांक ०६९/२०२३ आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

उप सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : नवी मुंबई.

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.
(२) प्रमाणपत्र तपासणीच्या वेळी पात्रतेसंदर्भातील सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास शिफारस/नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.